# RInfra–Generation (RInfra-G)

Executive Summary – Marathi:

Multi Year Tariff (MYT) Mid-Term Review (MTR) Petition for the Control Period: FY 2016-17 to FY 2019-20

Filed with

Maharashtra Electricity Regulatory Commission

RELIANCE

अनुक्रमणिका

**१. पार्श्वभूमी....४**
१.१ बहुवर्षीय वीज दर (बहुवर्षीय वीज दर) नियमावली....४
१.२ एमटीआर याचिकेचे उद्दिष्ट....४
**२. वीज खरेदी व्यवस्था....४**
**३. आर्थिक वर्ष २०१५–१६ चे समायोजन....५**
३.१ संचालन कामगिरी....५
३.२ इंधनाचा खर्च....५
३.३ पीएलएफ प्रोत्साहन....५
३.४ कार्यान्वयन आणि देखभाल खर्च....५
३.५ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण....५
३.६ कर्ज–इक्विटी प्रमाण....५
३.७ घसारा....६
३.८ खेळत्या भांडवलावरील व्याज....६
३.९ कर्ज भांडवलावरील व्याज....६
३.१० इक्विटीवरील परतावा....६
३.११ प्राप्तीकर....६
३.१२ विजेच्या विक्रीतून आलेला महसूल....६
३.१३ वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न....६
३.१४ आर्थिक वर्ष २०१५–१६ साठी समायोजन....७
**४. आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी समायोजन....८**
४.१ संचालन कामगिरी....८
४.२ इंधनाचा खर्च....८
४.३ पीएलएफ प्रोत्साहन....८
४.४ कार्यान्वयन आणि देखभाल खर्च....८
४.५ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण....९
४.६ कर्ज–इक्विटी प्रमाण....९
४.७ घसारा....९
४.८ खेळत्या भांडवलावरील व्याज....९
४.९ कर्ज भांडवलावरील व्याज....९
४.१० इक्विटीवरील परतावा....९
४.११ प्राप्तीकर....१०
४.१२ विजेच्या विक्रीतून आलेला महसूल....१०

४.१३ वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न........................................................................................................१०
४.१४ आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी समायोजन...............................................................................१०

**५. आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी तात्पुरते समायोजन**...............................................................११
५.१ संचालन कामगिरी ..........................................................................................................११
५.२ इंधनाचा खर्च.....................................................................................................................११
५.३ कार्यान्वयन आणि देखभाल खर्च..........................................................................................१२
५.४ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण.......................................................................................१२
५.५ कर्ज–इक्विटी प्रमाण...........................................................................................................१२
५.६ घसारा ..............................................................................................................................१२
५.७ खेळत्या भांडवलावरील व्याज...............................................................................................१३
५.८ कर्ज भांडवलावरील व्याज....................................................................................................१३
५.९ इक्विटीवरील परतावा..........................................................................................................१३
५.१० प्राप्तीकर...........................................................................................................................१३
५.११ विजेच्या विक्रीतून आलेला महसूल.........................................................................................१३
५.१२ वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न...................................................................................................१४
५.१३ आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी तात्पुरते समायोजन...................................................................१४

**६. आर्थिक वर्ष १८–१९ आणि आर्थिक वर्ष १९–२० साठी एकत्रित महसूल आवश्यकता.........................१५**
६.१ संचालन कामगिरी..............................................................................................................१५
६.२ इंधनाचा खर्च.....................................................................................................................१५
६.२.१ इंधनाचे जीसीव्ही...............................................................................................................१५
६.२.२ इंधनाचा जमिनीवरील खर्च...................................................................................................१६
६.३ कार्यान्वयन आणि देखभाल खर्च..........................................................................................१६
६.४ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण.......................................................................................१६
६.५ कर्ज– इक्विटी प्रमाण..........................................................................................................१६
६.६ घसारा...............................................................................................................................१७
६.७ खेळत्या भांडवलावरील व्याज...............................................................................................१७
६.८ कर्ज भांडवलावरील व्याज....................................................................................................१७
६.९ इक्विटीवरील परतावा..........................................................................................................१७
६.१० प्राप्तीकर...........................................................................................................................१७
६.११ वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न...................................................................................................१७
६.१२ आ.व. १५–१६ आणि आ.व. १६–१७ च्या महसूल तफावत/अधिशेष वरच्या वहन खर्चासहित आ.व. १७–१८ पर्यंतची एकत्रित महसुली तफावत.........................................................................१८
६.१३ आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी वार्षिक महसूल आवश्यकता.....................१८

## तक्तयांची सूची

तक्ता १: आर्थिक वर्ष २०१५–१६ साठी समायोजन.....७

तक्ता २ : आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी समायोजन.....१०

तक्ता ३: आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी तात्पुरते समायोजन.....१४

तक्ता ४: वहन खर्च आणि एकत्रित महसुली तफावत गणन.....१८

तक्ता ५: आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी वार्षिक महसूल आवश्यकता.....१८

तक्ता ६: आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी क्षमता (स्थिर) शुल्क आणि उर्जा शुल्क दर.....१९

RELIANCE

## १. पार्श्वभूमी

### १.१ बहुवर्षीय वीज दर (बहुवर्षीय वीज दर) नियमावली

माननीय महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (येथून पुढे माननीय आयोग/माननीय म.वि.नी.आ. असे संदर्भित) विद्युत कायदा २००३ (येथून पुढे विअ. ०३ असे संदर्भित) अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांची आणि त्या वतीने त्यांना सक्षम बनविणाऱ्या सर्व अधिकारांची अंमबजावणी करून खालील नियमावली जारी केली आहे.

- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय वीज दर) नियमावली, २०११ (येथून पुढे बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०११ असे संदर्भित) ४ फेब्रुवारी २०११ आणि
- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय वीज दर) नियमावली, २०१५ (येथून पुढे बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०१५ असे संदर्भित), ८ डिसेंबर २०१५ रोजी

बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०११ ही रिलायन्स इनफ्रास्ट्रक्चर लिमिटेडला (येथून पुढे आरइनफ्रा असे संदर्भित) आर्थिक वर्ष १२–१३ पासून पुढे दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी (२०११ च्या खटला क्र. ४५ मधील माननीय आयोगाच्या आदेशानुसार) आर्थिक वर्ष १५–१६ पर्यंत लागू आहे. बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०१५ ही आर्थिक वर्ष १६–१७ च्या तिसऱ्या नियंत्रण कालावधीपासून ते आर्थिक वर्ष १९–२० पर्यंत लागू आहे.

### १.२ एमटीआर याचिकेचे उद्दिष्ट

बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०१५ चे नियमन ५.१ (ब), आर्थिक वर्ष १५–१६ आणि आर्थिक वर्ष १६–१७ साठी समायोजन, आर्थिक वर्ष १७–१८ साठी तात्पुरते समायोजन आणि आर्थिक वर्ष १८–१९ आणि आर्थिक वर्ष १९–२० साठी सुधारित एआरआर भाकीत आणि दर असलेली मध्यावधी आढावा (एमटीआर) याचिका दाखल करण्याची तरतूद करते. उपरोक्त नियमनानुसार, आरइन्फ्रा–जनरेशन (येथून पुढे आरइन्फ्रा–जी असे संदर्भित) वर्तमान एमटीआर याचिका दाखल करत आहे.

## २. वीज खरेदी व्यवस्था

माननीय आयोगाच्या सूचनांनुसार, आरइन्फ्रा–जी ने आरइन्फ्रा–डिस्ट्रिब्युशनसह (आरइन्फ्रा–डी) एक वीज खरेदी करार (पीपीए) केला आहे, ज्याला माननीय आयोगाने २००८ च्या खटला क्र. ८ मधील १२ फेब्रुवारी २००९ च्या आदेशाने मान्यता दिली आहे. उपरोक्त पीपीएनुसार, डीटीपीएसची संपूर्ण निर्मिती या व्यवस्थेच्या प्रभावाच्या तारखेपासून अर्थात २३ फेब्रुवारी २००८ पासून, १० वर्षांच्या कालावधीसाठी, आरइन्फ्रा–डी ला पुरवली गेली पाहिजे.

माननीय आयोगाने आपल्या संबंधित बहुवर्षीय वीज दर आदेशांमध्ये आरइन्फ्राच्या निर्मिती व्यवसायाला (२०१६ चा खटला क्र. १४) तसेच वितरण व्यवसायाला (२०१६ चा खटला क्र. २४) दिलेल्या सूचनांनुसार, आरइन्फ्रा–जी आणि आरइन्फ्रा–डी ने एक याचिका (२०१७ चा खटला क्र. ५) दाखल करून माननीय आयोगाकडे आरइन्फ्रा–जी आणि आरइन्फ्रा–डी दरम्यान पुढील पीपीएसाठी मान्यता मागितली.

माननीय आयोगाने २०१७ च्या खटला क्र. ५ मधील ८ फेब्रुवारी २०१८ च्या आदेशाने आरइन्फ्रा–डी आणि आरइन्फ्रा–जी दरम्यान असलेल्या विद्यमान पीपीएला ५ वर्षांच्या कालावधीसाठी अर्थात २२ फेब्रुवारी २०२३ पर्यंत मान्यता दिली आहे.

**३. आर्थिक वर्ष २०१५–१६ साठी समायोजन**

वर्तमान एमटीआर याचिकेचा भाग म्हणून, बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०११ अंतर्गत आर्थिक वर्ष २०१५–१६ च्या समायोजनसाठी लेखापरीक्षण केलेल्या खात्यांवर आधारित, आरइन्फ्रा–जी, प्रत्यक्षात झालेला खर्च आणि आर्थिक वर्ष २०१५–१६ साठी मिळालेला महसूल सादर करीत आहे.

**३.१ संचालन कामगिरी**

आरइन्फ्रा–जी ने ८७.०९% च्या पीएलएफवर ३८२४.८४ एमयू (एकत्रित युनिट्स) निर्मिती केली असून आर्थिक वर्ष २०१५–१६ साठी ९६.६०% ची उपलब्धता कायम ठेवली आहे जी बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०११ मध्ये विनिर्दिष्ट ८५% उपलब्धता निकषापेक्षा खूप जास्त आहे आर्थिक वर्ष २०१५–१६ साठी अंतिम अचूक समायोजनच्या उद्दिष्टाने एफजीडीचा सहाय्यभूत वापर प्रत्यक्ष ४५.१२ एमयूवर विचाराधीन घेण्यात आला आहे ज्याला माननीय आयोगाने बहुवर्षीय वीज दर आदेशात मान्यता दिली आहे.

**३.२ इंधनाचा खर्च**

आर्थिक वर्ष २०१५–१६ दरम्यानचा प्रत्यक्ष इंधन खर्च ९७६.८२ कोटी रुपये आहे तथापि, प्रत्यक्ष आलेल्या किंमतीमध्ये इंधन खर्च आणि बहुवर्षीय वीज दर नियमावली २०११ च्या निकषांवर आधारीत किंमत १०३०.१८ कोटी रुपये आहे. या दोन्हींमधील फरक म्हणजे कार्यक्षमता फायदा होय आणि आरइन्फ्रा–जीला कार्यक्षमता फायद्यातील २/३ भाग राखून ठेवण्याचा अधिकार आहे. ९७६.८२ कोटी रुपये अधिक १०३०.१८ कोटी रुपये आणि ९७६.८२ कोटी रुपयांतील २/३ फरक अर्थात १०१२.३९ कोटी रूपये कार्यक्षमता फायद्यातील १/३ भाग ग्राहकांमध्ये वितरित केला जातो.

**३.३ पीएलएफ प्रोत्साहन**

बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०११ च्या नियम ४९.८ मध्ये कोळशावर आधारित औष्णिक विद्युत निर्मिती स्थानकांसाठी विनिर्दिष्ट केलेल्या ८५%निकषांहून जास्त पीएलएफ प्राप्त करण्यासाठी प्रोत्साहनाची तरतूद स्पष्ट करण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०१५–१६, दरम्यान आरइन्फ्रा–जीने ८७.०९% पीएलएफ प्राप्त केला असून त्यामुळे १३.६८ कोटी रूपयांच्या पीएलएफ प्रोत्साहनांना ती पात्र आहे.

**३.४ कार्यान्वयन आणि देखभाल खर्च**

आरइन्फ्रा–जी सादर करते की माननीय आयोगाने तात्पुरती मान्यता दिलेल्या १३९.२७ कोटी रुपयांच्या (कार्यक्षमता फायदा वगळून) तुलनेत आर्थिक वर्ष २०१५–१६ दरम्यानचा प्रत्यक्ष कार्यान्वयन आणि देखभाल खर्च १४३.२२ कोटी रुपये झाला ज्यामध्ये ३.३६ कोटी रुपये कार्यक्षमता फायदा होता.

**३.५ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण**

आरइन्फ्रा–जी सादर करते की साठी बांधकामादरम्यानचे व्याज (आयडीसी) समाविष्ट करून आर्थिक वर्ष २०१५–१६ साठी भांडवलीकरण ३१.६३ कोटी रुपये आहे ज्यासाठी माननीय आयोगाने बहुवर्षीय वीज दर आदेशात ३१.०४ कोटी रुपयांना मान्यता दिलेली आहे.

**३.६ कर्ज–इक्विटी प्रमाण**

आर्थिक वर्ष २०१५–१६ मध्ये निर्मिती उद्योगात भांडवली खर्चासाठी प्रत्यक्ष कर्ज घेण्यात आलेले नसल्यामुळे, आरइन्फ्रा–जीने म.वि.नी.आ बहुवर्षीय वीज दर नियमावली २०११ च्या नियम ३१ नुसार आर्थिक वर्ष २०१५–१६ साठी अचूक समायोजन करण्यासाठी इक्विटीवरील परतावा (आरओई) आणि कर्जावरील व्याजाच्या मोजणीसाठी ७०:३० या प्रमाणात भांडवल आणि खर्च योजनांसाठी निकषात्मक निधीपुरवठा विचाराधीन घेतला आहे.

RELIANCE

**३.७ घसारा**

म.वि.नी.आ बहुवर्षीय वीज दर नियमावली २०११ मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार घसारा दराप्रमाणे घसारा मोजण्यात आला आहे आणि एकत्रित स्थावर मालमत्तेच्या (जीएफए) आर्थिक वर्ष २०१५–१६ साठीचा आरंभीची शिल्लक आणि या वर्षात भर घालण्यात आलेल्या मालमत्तांवर, भांडवलीकरणाच्या प्रत्यक्ष तारखेनुसार मोजण्यात आला आहे. बहुवर्षीय वीज दर नियमावली २०११ नुसार, आरंभीच्या शिलकीमधील कोणतीही मालमत्ता ०१.०४.२०१५ नुसार ७०% घसाऱ्यापर्यंत पोहोचली असेल किंवा हे मूल्य आर्थिक वर्ष २०१५–१६ मध्ये ओलांडून पुढे जात असेल तर त्यानंतर अशा मालमत्तेवरील घसारा सुधारित दरांचा विचार करून निश्चित केला जातो, जो त्या मालमत्तेच्या उर्वरित उपयुक्त आयुष्यावर मोजले जाणारे उर्वरित घसारायोग्य मूल्य विस्तारित करून मोजला जातो.

**३.८ खेळत्या भांडवलावरील व्याज**

आरइन्फ्रा–जीने म.वि.नी.आ बहुवर्षीय वीज दर नियमावली २०११ च्या नियम ३५.१ नुसार खेळती भांडवली आवश्यकता आणि त्यावरील व्याज मोजले आहे. आरइन्फ्रा–जीने माननीय आयोगाच्या एमवायटी आदेशानुसार खेळत्या भांडवलावरील व्याज मोजण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया ॲडव्हान्स रेट (एसबीएआर) १४.७५% विचाराधीन घेतला आहे.

**३.९ कर्ज भांडवलावरील व्याज**

आरइन्फ्रा–जीच्या बाबतीत प्रत्यक्ष कर्ज नसल्यामुळे परंतु निकषात्मक कर्ज अजूनही देणे असल्यामुळे आर्थिक वर्ष २०१५–१६ साठीच्या अधिभारित सरासरी व्याजदरावरील देणे असलेल्या प्रत्यक्ष कर्ज शिलकीतून आरइन्फ्रा–टी आणि आरइन्फ्रा–डीच्या १ एप्रिल २०१५ रोजीच्या प्रत्यक्ष मोजणीतून अधिभारित सरासरी व्याजदर १०.९२ % आहे. हा अधिभारित सरासरी व्याजदर आर्थिक वर्ष २०१५–१६ च्या आरंभीच्या आणि अखेरच्या होणाऱ्या कर्जशिलकीत लागू करण्यात आला आहे आणि माननीय आयोगाने आपल्या एमवायटी आदेशात सादर करून घेतलेल्या आणि मान्यता दिलेल्या आरंभीच्या कर्ज शिलकीचा विचार करून आणि आर्थिक वर्ष २०१५–१६ दरम्यान भर टाकण्यात आलेल्या कर्जाचा विचार केला असून त्यातून आर्थिक वर्ष २०१५–१६ मध्ये ७०% भांडवलीकरण झाले आहे.

**३.१० इक्विटीवरील परतावा**

म.वि.नी.आ बहुवर्षीय वीज दर नियमावली २०११ च्या नियम ३२.१ मध्ये विशिष्ट वर्षाच्या आरंभीच्या इक्विटी पायावर १५.५% दराने इक्विटीवर परताव्याची तरतूद विनिर्दिष्ट करण्यात आली आहे. हीच पद्धत लागू करून आरइन्फ्रा–जीने सदर याचिकेत परवानगीयोग्य आरओई आर्थिक वर्ष २०१५–१६ च्या आरंभीच्या इक्विटी पायावर मोजला आहे.

**३.११ प्राप्तीकर**

आरइन्फ्रा–जीने आर्थिक वर्ष २०१५–१६ साठी उत्पन्न आणि परवानगीयोग्य खर्च यांच्यावर आधारित नियामकांचा करपूर्व नफा विचाराधीन घेऊन प्राप्तीकर निश्चित केला आहे.

**३.१२ विजेच्या विक्रीतून आलेला महसूल**

आरइन्फ्रा–जी नमूद करत आहे की, आर्थिक वर्ष २०१५–१६ साठी निर्माण केलेल्या विजेच्या विक्रीतून एकूण महसूल १३७३.६३ कोटी रूपये आहे ज्यात वीजदर (अधिक एफएसी), स्थिर दर आणि पीएलएफ प्रोत्साहन यांचाही समावेश करण्यात आला आहे.

**३.१३ वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न**

आरइन्फ्रा–जी नमूद करत आहे की, आर्थिक वर्ष २०१५–१६ दरम्यान मिळालेले एकूण वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न १६.८४ कोटी रूपये आहे, माननीय आयोगाने बहुवर्षीय वीज दर आदेशात १७.३० कोटी रुपयांना मान्यता दिलेली आहे.

### ३.१४ आर्थिक वर्ष २०१५–१६ साठी समायोजन

आरइन्फ्रा–जी आर्थिक वर्ष २०१५–१६ साठी अचूक समायोजनाचा सारांश खालील तक्तयात दिल्याप्रमाणे सादर करत आहे.

**तक्ता १ : आर्थिक वर्ष २०१५–१६ साठी समायोजन**

| अनु क्र. | तपशील (कोटी रुपयांमध्ये) | बहुवर्षीय वीज दर आदेश (तात्पुरते समायोजन) | प्रत्यक्ष (अंतीम समायोजनासाठी) |
|---|---|---|---|
| | **खर्च** | | |
| १ | इंधन खर्च | ९७६.८२ | ९७६.८२ |
| २ | कार्यान्वयन आणि देखभाल खर्च | १३९.२७ | १३९.८६ |
| ३ | घसारा | २७.०२ | २७.८८ |
| ४ | दीर्घकालीन कर्ज भांडवलावरील व्याज | १९.९२ | १९.९० |
| ५ | खेळत्या भांडवलावरील व्याज | १५.८८ | १५.४२ |
| ६ | इतर खर्च | – | – |
| ७ | प्राप्तीकर | ४०.१८ | ५३.०९ |
| **क** | **एकूण खर्च (१+२+३+४+५+६+७)** | **१,२१९.०९** | **१,२३२.९६** |
| | | | |
| ८ | इक्विटीवरील परतावा | ८८.२३ | ८८.२३ |
| ९ | अधिक:उच्च पीएलएफसाठी प्रोत्साहन | – | १३.६८ |
| १० | अधिक: इंधन खर्चात कार्यक्षमता प्राप्तीच्या २/३ | – | ३५.५८ |
| ११ | अधिक:कार्यान्वय आणि देखभाल खर्चात कार्यक्षमता प्राप्तीच्या २/३ | – | ३.३६ |
| | | | |
| **ख** | **एकूण आरओई+फायदा+ प्रोत्साहन (८+९+१०+११)** | **८८.२३** | **१४०.८५** |
| | | | |
| | **महसूल** | | |
| १२ | विजेच्या विक्रीतून आलेला महसूल | १,३७३.८६ | १,३७३.६३ |
| १३ | इतर उत्पन्न | १७.३० | १६.८४ |
| **ग** | **एकूण महसूल (१२+१३)** | **१,३९१.१६** | **१,३९०.४७** |
| | | | |
| १४ | स्वतंत्र महसुली तफावत/(अतिरिक्त) आर्थिक वर्ष २०१५–१६ साठी (क+ख–ग) | (८३.८४) | (१६.६५) |
| १५ | अधिक एटीई आदेशाचा परिणाम म्हणून येणारी तफावत | १३५.७४ | १३५.७४ |
| १६ | अधिक आर्थिक वर्ष २०१२–१३ आणि आर्थिक वर्ष २०१३–१४ साठी पुढे नेण्याच्या खर्चासह अतिरिक्त महसूल | (५८.५१) | (५८.५१) |
| १७ | अधिक आर्थिक वर्ष २०१४–१५ साठी तात्पुरते समायोजन | (११.११) | (११.११) |

| अनु क्र. | तपशील (कोटी रुपयांमध्ये) | बहुवर्षीय वीज दर आदेश (तात्पुरते समायोजन) | प्रत्यक्ष (अंतीम समायोजनासाठी) |
|---|---|---|---|
| | | | |
| **घ** | **महसुली तफावत/ (अतिरिक्त) (१४+१५+१६+१७)** | **(१७.७२)** | **४९.४७** |
| **च** | **अर्ध्या वर्षासाठी वहन खर्च** | | **३.६५** |
| **छ** | **वहन खर्चासह महसुली तफावत (घ + च)** | **(१७.७२)** | **५३.१२** |

### ४. आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी समायोजन

वर्तमान एमटीआर याचिकेचा भाग म्हणून, बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०१५ अंतर्गत आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या समायोजनसाठी लेखापरीक्षण केलेल्या खात्यांवर आधारित, आरइन्फ्रा-जी, प्रत्यक्षात झालेला खर्च आणि आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी मिळालेला महसूल सादर करीत आहे.

### ४.१ संचालन कामगिरी

आरइन्फ्रा-जी ने ८५.४५% च्या पीएलएफवर ३७४२.५३ एमयू (एकत्रित युनिट्स) निर्मिती केली असून आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी ९९.५१% ची उपलब्धता कायम ठेवली आहे जी बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०१५ मध्ये विनिर्दिष्ट ८५% उपलब्धता निकषापेक्षा खूप जास्त आहे. आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी अंतिम अचूक समायोजनच्या उद्दिष्टाने एफजीडीचा सहाय्यभूत वापर प्रत्यक्ष ४५.८९ एमयूवर विचाराधीन घेण्यात आला आहे.

### ४.२ इंधनाचा खर्च

आर्थिक वर्ष २०१६-१७ दरम्यानचा प्रत्यक्ष इंधन खर्च १००३.६३ कोटी रुपये आहे. तथापि, प्रत्यक्ष आलेल्या किंमतीमध्ये इंधन खर्च आणि बहुवर्षीय वीज दर नियमावली २०१५ च्या निकषांवर आधारित किंमत १०७९.६१ कोटी रुपये आहे. या दोन्हींमधील फरक म्हणजे कार्यक्षमता फायदा होय आणि आरइन्फ्रा-जीला कार्यक्षमता फायद्यातील २/३ भाग राखून ठेवण्याचा अधिकार आहे. १००३.६३ कोटी रुपये अधिक १०७९.६१ कोटी रुपये आणि १००३.६३ कोटी रुपयांतील १/३ फरक अर्थात १०२८.९६ कोटी रूपयांच्या पीएलएफ प्रोत्साहनांना ती पात्र आहे. कार्यक्षमता फायद्यातील २/३ भाग ग्राहकांमध्ये वितरित केला जातो.

### ४.३ पीएलएफ प्रोत्साहन

बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०१५ च्या नियम ४८.७ मध्ये कोळशावर आधारित औष्णिक विद्युत निर्मिती स्थानकांसाठी विनिर्दिष्ट केलेल्या ८५%निकषांहून जास्त पीएलएफ प्राप्त करण्यासाठी प्रोत्साहनाची तरतूद स्पष्ट करण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०१६-१७, दरम्यान आरइन्फ्रा-जीने ८५.४५% पीएलएफ प्राप्त केला असून त्यामुळे ०.८३ कोटी रूपयांच्या पीएलएफ प्रोत्साहनांना ती पात्र आहे.

### ४.४ कार्यान्वयन आणि देखभाल खर्च

आरइन्फ्रा-जी नमूद करते की आर्थिक वर्ष २०१६-१७ दरम्यान झालेला प्रत्यक्ष कार्यान्वयन आणि देखभाल खर्च हा रू. ०.९३ कोटीच्या कार्यक्षमता फायद्यासह १४६.६६ कोटी रुपये आहे, ज्यासाठी माननीय आयोगाने १४७.८४ कोटी रुपयांची(कार्यक्षमता फायदा वगळून) अस्थायी रूपाने मान्यता दिलेली आहे.

#### ४.५ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

आरइन्फ्रा–जी सादर करते की साठी बांधकामादरम्यानचे व्याज (आयडीसी) समाविष्ट करून आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी भांडवलीकरण ३३.०९ कोटी रुपये आहे ज्यासाठी माननीय आयोगाने बहुवर्षीय वीज दर आदेशात ६९.१५ कोटी रुपयांना मान्यता दिलेली आहे.

#### ४.६ कर्ज–इक्विटी प्रमाण

आर्थिक वर्ष २०१६–१७ मध्ये निर्मिती उद्योगात भांडवली खर्चासाठी प्रत्यक्ष कर्ज घेण्यात आलेले नसल्यामुळे, आरइन्फ्रा–जीने म.वि.नी.आ बहुवर्षीय वीज दर नियमावली २०१५ च्या नियम २६ नुसार आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी अचूक समायोजन करण्यासाठी इक्विटीवरील परतावा (आरओई) आणि कर्जावरील व्याजाच्या मोजणीसाठी ७०:३० या प्रमाणात भांडवल आणि खर्च योजनांसाठी निकषात्मक निधीपुरवठा विचाराधीन घेतला आहे.

#### ४.७ घसारा

म.वि.नी.आ बहुवर्षीय वीज दर नियमावली २०१५ मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार घसारा दराप्रमाणे घसारा मोजण्यात आला आहे आणि एकत्रित स्थावर मालमत्तेच्या (जीएफए) आर्थिक वर्ष २०१६–१७ साठीचा आरंभीची शिल्लक आणि या वर्षात भर घालण्यात आलेल्या मालमत्तांवर, भांडवलीकरणाच्या प्रत्यक्ष तारखेनुसार मोजण्यात आला आहे. बहुवर्षीय वीज दर नियमावली २०१५ नुसार, आरंभीच्या शिलकीमधील कोणतीही मालमत्ता ०१.०४.२०१६ नुसार ७०% घसाऱ्यापर्यंत पोहोचली असेल किंवा हे मूल्य आर्थिक वर्ष २०१६–१७ मध्ये ओलांडून पुढे जात असेल तर त्यानंतर अशा मालमत्तेवरील घसारा सुधारित दरांचा विचार करून निश्चित केला जातो, जो त्या मालमत्तेच्या उर्वरित उपयुक्त आयुष्यावर मोजले जाणारे उर्वरित घसारायोग्य मूल्य विस्तारित करून मोजला जातो.

#### ४.८ खेळत्या भांडवलावरील व्याज

आरइन्फ्रा–जीने म.वि.नी.आ बहुवर्षीय वीज दर नियमावली २०१५ च्या नियम ३१ नुसार खेळती भांडवली आवश्यकता आणि त्यावरील व्याज मोजले आहे. आरइन्फ्रा–जीने खेळत्या भांडवलावरील व्याज मोजण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया बेस रेट अधिक १५० बेसिक पॉईंट्स विचाराधीन घेतला आहे जो १०.७९% होतो.

#### ४.९ कर्ज भांडवलावरील व्याज

आरइन्फ्रा–जीच्या बाबतीत प्रत्यक्ष कर्ज नसल्यामुळे परंतु निकषात्मक कर्ज अजूनही देणे असल्यामुळे आर्थिक वर्ष २०१६–१७ साठीच्या अधिभारित सरासरी व्याजदरावरील देणे असलेल्या प्रत्यक्ष कर्ज शिलकीतून आरइन्फ्रा–टी आणि आरइन्फ्रा–डीच्या आर्थिक वर्ष २०१६–१७ मध्ये घेतलेल्या प्रत्यक्ष कर्जाच्या मोजणीतून अधिभारित सरासरी व्याजदर १०.९५% आहे. हा अधिभारित सरासरी व्याजदर आर्थिक वर्ष २०१६–१७ च्या आरंभीच्या आणि अखेरच्या होणाऱ्या कर्जशिलकीत लागू करण्यात आला आहे आणि आर्थिक वर्ष २०१५–१६ च्या आरंभीच्या कर्ज शिलकीचा विचार करून आणि आर्थिक वर्ष २०१६–१७ दरम्यान भर टाकण्यात आलेल्या कर्जाचा विचार करून केला असून त्यातून आर्थिक वर्ष २०१६–१७ मध्ये ७०% भांडवलीकरण झाले आहे.

#### ४.१० इक्विटीवरील परतावा

म.वि.नी.आ बहुवर्षीय वीज दर नियमावली २०१५ च्या नियम २८.३ मध्ये विशिष्ट वर्षाच्या आरंभीच्या इक्विटी पायावर १५.५% दराने आणि त्या वर्षामध्ये वाढलेल्या ५०% इक्विटीवर परताव्याची तरतूद विनिर्दिष्ट करण्यात आली आहे. त्यानुसार, आरइन्फ्रा–जीने आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी परवानगीयोग्य आरओई मोजला आहे.

### ४.११ प्राप्तीकर

आरइन्फ्रा–जीने आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी उत्पन्न आणि परवानगीयोग्य खर्च यांच्यावर आधारित नियामकांचा करपूर्व नफा विचाराधीन घेऊन प्राप्तीकर निश्चित केला आहे.

### ४.१२ विजेच्या विक्रीतून आलेला महसूल

आरइन्फ्रा–जी नमूद करत आहे की, आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी निर्माण केलेल्या विजेच्या विक्रीतून एकूण महसूल १३८२.२८ कोटी रूपये आहे ज्यात वीजदर (अधिक एफएसी), स्थिर दर आणि पीएलएफ प्रोत्साहन यांचाही समावेश करण्यात आला आहे.

### ४.१३ वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न

आरइन्फ्रा–जी नमूद करत आहे की, आर्थिक वर्ष २०१६–१७ दरम्यान मिळालेले एकूण वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न २९.४४ कोटी रूपये आहे, माननीय आयोगाने बहुवर्षीय वीज दर आदेशात १७.३० कोटी रुपयांना मान्यता दिलेली आहे.

### ४.१४ आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी समायोजन

आरइन्फ्रा–जी आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी अचूक समायोजनाचा सारांश खालील तक्तयात दिल्याप्रमाणे सादर करत आहे.

**तक्ता २ : आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी समायोजन**

| अनु. क्र. | तपशील (कोटी रुपयांमध्ये) | बहुवर्षीय वीज दर आदेश | प्रत्यक्ष |
|---|---|---|---|
| | **खर्च** | | |
| १ | इंधन खर्च | १,२३५.४५ | १,००३.६३ |
| २ | कार्यान्वयन आणि देखभाल खर्च | १४७.८४ | १४५.७३ |
| ३ | घसारा | २७.३३ | २९.८५ |
| ४ | दीर्घकालीन कर्ज भांडवलावरील व्याज | २०.२९ | १९.२६ |
| ५ | खेळत्या भांडवलावरील व्याज | १२.९५ | १९.८० |
| ६ | इतर खर्च | – | – |
| ७ | प्राप्तीकर | ४०.१८ | ५७.७१ |
| ८ | आर्थिक वर्ष २०१४–१५ साठी महसुली तफावतीचा धारण खर्च/(अतिरिक्त) | (३.०१) | (३.०१) |
| ९ | आर्थिक वर्ष २०१५–१६ पर्यंत एकत्रित महसुली तफावत/(अतिरिक्त) | (१७.७२) | (१७.७२) |
| | | | |
| **क** | **एकूण खर्च (१+२+३+४+५+६+७+८+९)** | **१,४६३.३१** | **१,२५५.२५** |
| | | | |
| १० | इक्विटीवरील परतावा | ९१.२८ | ९०.३६ |
| ११ | अधिक:उच्च पीएलएफसाठी प्रोत्साहन | – | ०.८३ |
| १२ | अधिक: इंधन खर्चात कार्यक्षमता प्राप्तीच्या २/३ | – | २५.३३ |
| १३ | अधिक:कार्यान्वय आणि देखभाल खर्चात कार्यक्षमता प्राप्तीच्या २/३ | – | ०.९३ |
| | | | |

| अनु. क्र. | तपशील (कोटी रुपयांमध्ये) | बहुवर्षीय वीज दर आदेश | प्रत्यक्ष |
|---|---|---|---|
| **ख** | **एकूण आरओई+फायदा+ प्रोत्साहन (१०+११+१२+१३)** | **९१.२८** | **११७.४५** |
| | | | |
| | **महसूल** | | |
| १२ | विजेच्या विक्रीतून आलेला महसूल | १,५३७.२९ | १,३८२.२८ |
| १३ | इतर उत्पन्न | १७.३० | २९.४४ |
| | | | |
| **ग** | **एकूण महसूल (१२+१३)** | **१,५५४.५९** | **१,४११.७२** |
| | | | |
| **घ** | **महसुली तफावत/ (अतिरिक्त) ((क)+(ख))-(ग)** | **-** | **(३९.०२)** |
| **च** | **अर्ध्या वर्षासाठी धारण खर्च** | | **(२.११)** |
| **छ** | **धारण खर्चासह महसुली तफावत/(अतिरिक्त)** | **-** | **(४१.१३)** |

### ५. आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी तात्पुरते समायोजन

या विभागात माननीय आयोगाने जारी केलेला आदेश आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या पहिल्या सहामाहीतील प्रत्यक्ष कामगिरी आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ ची दुसऱ्या सहामाहीतील अंदाजित कामगिरी विचारात घेऊन आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या कामगिरीच्या अभिप्रायाचा समावेश आहे.

### ५.१ संचालन कामगिरी

आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या पहिल्या सहामाहीत आरइन्फ्रा-जीने ८४.९१% पीएलएफ ला१८६४.६९ एमयू (एकूण) निर्मिती केली असून ९६.७९% उपलब्धता कायम राखली आहे. पहिल्या सहामाहीतील प्रत्यक्ष कामगिरी ही बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०१५ मध्ये नमूद नियमांहून जास्त आहे. पहिल्या सहामाहीमध्ये, प्रामुख्याने प्रकल्पामध्ये उत्पादन थांबवल्यामुळे, बहुवर्षीय वीज दर आदेशाने मान्यता दिलेल्याहून पीएलएफ कमी होते. आरइन्फ्रा-जी सादर करते की पुरेसा कोळसा उपलब्ध नसल्यामुळे २० सप्टेंबर २०१७ ते १० ऑक्टोबर २०१७ दरम्यान डीटीपीएसचे युनिट २ बंद होते. तसेच, त्याच कालावधी दरम्यान युनिट १ किमान तांत्रिक क्षमतेने चालू होते. १० ऑक्टोबरपासून, दोन्ही युनिट्स मागणीनुसार चालू आहेत. आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या दुसऱ्या सहामाहीतील अधिभारित कार्यान्वयन निकषांनुसार, आरइन्फ्रा-जी ने ८९.०१% पीएलएफ ला१९४४ एमयूची एकूण  निर्मिती करण्याचे आणि त्याच (८९.०१%) पीएलएफने उपलब्धता कायम राखण्याचे भाकीत केले आहे.

### ५.२ इंधनाचा खर्च

आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या पहिल्या सहामाहीमध्ये झालेला प्रत्यक्ष इंधन खर्च ५५९.९२ कोटी रुपये आहे आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या दुसऱ्या सहामाहीमध्ये. ५९६.६७ कोटी रुपये इंधन खर्च होण्याचे भाकीत आहे जो आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी एकत्रितपणे ११५६.५९ कोटी रुपये होतो.

केंद्रिय उत्पादन शुल्क आणि सीमाशुल्क मंडळ (सीबीईसी) ने, आपल्या तारीख १० एप्रिल २०१३ च्या परिपत्रकाद्वारे, कामगार भरती नियमांवर आधारित विविध सीमाशुल्क सुविधांतील खर्च वसुली शुल्कांच्या देयकातून सूट देण्यासाठी पात्रता मापदंड दिलेले आहेत. जुन २०१७ मध्ये सीमाशुल्काने ६.५५ कोटी रुपयांच्या (एप्रिल २०११ ते मार्च २०१७) वसुलीसाठी कारणे दाखवा (एससीएन) नोटिस बजावली कारण आरइन्फ्रा-जी या सूट मापदंडांची पूर्तता करत नाही. आरइन्फ्रा-जी सादर करते की प्रमुख सीमाशुल्क आयुक्तांनी (प्रतिबंधात्मक) ७ फेब्रुवारी २०१८ तारखेला एक आदेश

जारी केला ज्यामध्ये आरइन्फ्राला एप्रिल २०११ ते मार्च २०१७ या कालावधीसाठी ५,८८,९५,४८९ रुपये खर्च वसुली शुल्क, २८ फेब्रुवारी २०१८ पर्यंत अदा करण्याबाबत सूचना देण्यात आली. उपरोक्त आदेशामध्ये मागणी केलेले शुल्क आरइन्फ्रा–जीने आर्थिक वर्ष १७–१८ मध्ये अदा केलेले आहे आणि त्यानुसार, आरइन्फ्रा–जीने आर्थिक वर्ष १७–१८ च्या इंधन खर्चामध्ये ५.८९ कोटी रुपये खर्च वसुली शुल्क समाविष्ट केले आहे. अशाप्रकारे, आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी ११६२.४८ कोटी रूपयांच्या एकूण खर्चाचा दावा केला जात आहे.

**५.३ कार्यान्वयन आणि देखभाल खर्च**

माननीय आयोगाने २९.११.२०१७ रोजी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय वीज दर) (पहिली सुधारणा) नियमावली, २०१७ जारी केली, ज्यामध्ये माननीय आयोगाने इतर गोष्टींबरोबरच, निर्मिती कंपनी आणि वितरण परवान्यासाठी कार्यान्वयन आणि देखभाल खर्च ठरविण्यासाठीच्या सूत्रामध्ये सुधारणा केली.

आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी मूलभूत कार्यान्वयन आणि देखभाल खर्चाचा अंदाज बांधण्यासाठी, आरइन्फ्रा–जीने आर्थिक वर्ष २०१६–१७ साठीच्या मूलभूत कार्यान्वयन आणि देखभाल खर्चांना ४.२६% हा वृद्धी घटक लावला आहे (सुधारणा नियमावलीचा विचार करून) यामध्ये, अंदाजे कॉर्पोरेट वाटप खर्च आणि पाण्याच्या शुल्कावरील अंदाजे खर्च समाविष्ट केले आहेत. दोन्हींसाठी, दुसऱ्या सहामाहीतील खर्च हे आर्थिक वर्ष २०१७–१८ च्या पहिल्या सहामाहीमध्ये झालेले प्रत्यक्ष खर्च विचारात घेतले आहेत. अशाप्रकारे, आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी १५२.६१ कोटी रुपये आहे कार्यान्वयन आणि देखभाल खर्च आहे, ज्यासाठी माननीय आयोगाने बहुवर्षीय वीज दर आदेशात १५२.२२ कोटी रुपयांना मान्यता दिलेली आहे.

**५.४ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण**

पहिल्या सहामाहीमध्ये, एकूण मालमत्तांपैकी २६.०६ कोटी रुपयांच्या मालमत्तांचे भांडवलीकरण करून त्या उपयोगात आणलेल्या आहेत, यामध्ये आयडीसीचा समावेश होतो. आरइन्फ्रा–जी ला आर्थिक वर्ष २०१७–१८ च्या दुसऱ्या सहामाहीमध्ये आणखी ४४.२९ कोटी रुपयांच्या मालमत्तांचे भांडवलीकरण करणे अपेक्षित आहे. सध्या चालू असलेली भांडवली कामे, अंमलबजावणी होत असलेल्या मागण्या आणि साहित्य वगैरेंची संभाव्य प्राप्ती यावर हे भाकीत आधारित आहे. आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी ७०.३४ कोटी रुपयांच्या भांडवलीकरणाचा अंदाज आहे, ज्यासाठी माननीय आयोगाने बहुवर्षीय वीज दर आदेशात ३९.४८ कोटी रुपयांना मान्यता दिलेली आहे.

**५.५ कर्ज–इक्विटी प्रमाण**

आर्थिक वर्ष २०१७–१८ मध्ये निर्मिती उद्योगात भांडवली खर्चासाठी प्रत्यक्ष कर्ज घेण्यात आलेले नसल्यामुळे, आरइन्फ्रा–जीने म.वि.नी.आ बहुवर्षीय वीज दर नियमावली २०१५ च्या नियम २६ नुसार आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी अचूक समायोजन करण्यासाठी इक्विटीवरील परतावा (आरओई) आणि कर्जावरील व्याजाच्या मोजणीसाठी ७०:३० या प्रमाणात भांडवल आणि खर्च योजनांसाठी निकषात्मक निधीपुरवठा विचाराधीन घेतला आहे.

**५.६ घसारा**

म.वि.नी.आ बहुवर्षीय वीज दर नियमावली २०१५ मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार घसारा दराप्रमाणे घसारा मोजण्यात आला आहे आणि एकत्रित स्थावर मालमत्तेच्या (जीएफए) आर्थिक वर्ष २०१७–१८ साठीचा आरंभीची शिल्लक आणि आर्थिक वर्ष २०१७–१८ च्या पहिल्या सहामाहीमध्ये भर घालण्यात आलेल्या मालमत्ता आणि दुसऱ्या सहामाहीतील प्रस्तावित भांडवलीकरणानुसार मोजण्यात आला आहे.

बहुवर्षीय वीज दर नियमावली २०१५ नुसार, आरंभीच्या शिलकीमधील कोणतीही मालमत्ता १ एप्रिल २०१७ नुसार ७०% घसाऱ्यापर्यंत पोहोचली असेल किंवा हे मूल्य आर्थिक वर्ष २०१७–१८ मध्ये ओलांडून पुढे जात असेल तर त्यानंतर अशा

मालमत्तेवरील घसारा सुधारित दरांचा विचार करून निश्चित केला जातो, जो त्या मालमत्तेच्या उर्वरित उपयुक्त आयुष्यावर मोजले जाणारे उर्वरित घसारायोग्य मूल्य विस्तारित करून मोजला जातो.

आर्थिक वर्ष २०१७–१८ च्या दुसऱ्या सहामाहीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या मालमत्तांसाठी, मध्यावधीची बेरीज विचारात घेऊन आणि बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०१५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराने घसारा मोजला गेला आहे.

**५.७ खेळत्या भांडवलावरील व्याज**

आरइन्फ्रा–जीने म.वि.नी.आ बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०१५ च्या नियम ३१ नुसार खेळत्या भांडवलाच्या आवश्यकतेची गणना केली आहे.

२९ नोव्हेंबर २०१७ पासून अंमलात येणाऱ्या बहुवर्षीय वीज दर (पहिली सुधारणा) नियमावली, २०१७ नुसार आर्थिक वर्ष १७–१८ साठी खेळत्या भांडवलावरील व्याज मोजण्यासाठी पहिल्या आठ महिन्यांसाठी स्टेट बँक ऑफ इंडियाचा बेस रेट अधिक १५० बेसिक पॉईंट्स आणि उर्वरित चार महिन्यांसाठी एसबीआयचा एक वर्षाचा एमसीएलआर अधिक १५० बेसिक पॉईंट्स विचारात घेतला आहे जो १०.२०% (८.७०% + १.५०%) होतो.

**५.८ कर्ज भांडवलावरील व्याज**

आरइन्फ्रा–जी सादर करते की प्रस्तावित भांडवलीकरणासाठी वित्तपुरवठा करण्याकरिता बाहेरून कर्ज घेतलेले नसल्यामुळे, त्यासाठी अंतर्गत उपार्जनातून निधी देण्याचे प्रस्तावित आहे.

बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०१५ अनुसार, हे वापरलेले भांडवल प्रमाणक कर्ज धरले जाते ज्याचा प्रमाणक व्याज दर ११.१६% आहे, जो बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०१५ च्या नियम २९ नुसार आरइन्फ्रा–टी आणि आरइन्फ्रा–डी च्या अन्य नियंत्रित व्यवसायांच्या कर्जांना लागू होणाऱ्या व्याज दराचा सरासरी दर असून तो आर्थिक वर्ष २०१७–१८ मधील कर्जावरील व्याज मोजण्यासाठी विचारात घेतला आहे.

**५.९ इक्विटीवरील परतावा**

म.वि.नी.आ बहुवर्षीय वीज दर नियमावली २०१५ च्या नियम २८.३ मध्ये विशिष्ट वर्षाच्या आरंभीच्या इक्विटी पायावर १५.५% दराने आणि त्या वर्षामध्ये वाढलेल्या ५०% इक्विटीवर परताव्याची तरतूद विनिर्दिष्ट करण्यात आली आहे. त्यानुसार, आरइन्फ्रा–जीने आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी परवानगीयोग्य आरओई मोजला आहे.

**५.१० प्राप्तीकर**

आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी, आरइन्फ्रा–जीसाठीचा प्राप्तीकर आर्थिक वर्ष २०१६–१७ इतकाच असेल असे तात्पुरत्या स्वरूपात अंदाजित केले आहे.

**५.११ विजेच्या विक्रीतून आलेला महसूल**

आरइन्फ्रा–जी नमूद करते की निर्माण झालेल्या विजेच्या विक्रीतून निर्माण झालेला महसूल हा वीजेसाठी आकारलेल्या शुल्काच्याच दराने (अधिक एफएसी) आणि माननीय आयोगाने आपल्या २०१६ च्या खटला क्र. १४ मध्ये बहुवर्षीय वीज दर आदेशामध्ये मंजूर केल्यानुसार आहे.

आरइन्फ्रा–जी नमूद करते की पहिल्या सहामाहीसाठी एफएसी महसूल विचारात घेतलेला आहे. तथापि, पहिल्या सहामाहीच्या पीएलएफ प्रोत्साहनाचा सध्या तात्पुरत्या समायोजनासाठी दावा केला जात नाही.

RELIANCE

### ५.१२ वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न

आरइन्फ्रा–जी नमूद करत आहे की, एकूण वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न ७.०४ कोटी रुपये आहे. आर्थिक वर्ष २०१७–१८ च्या दुसऱ्या सहामाहीसाठी, वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न हे पहिल्या सहामाहीइतकेच विचारात घेतले आहे. त्यानुसार, आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न १४.०७ कोटी रुपये असण्याचा अंदाज आहे.

### ५.१३ आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी तात्पुरते समायोजन

आरइन्फ्रा–जी आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी तात्पुरत्या समायोजनाचा सारांश खालील तक्तयात दिल्याप्रमाणे सादर करत आहे.

**तक्ता ३: आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी तात्पुरते समायोजन**

| अनु. क्र. | तपशील (कोटी रुपयांमध्ये) | मंजूर बहुवर्षीय वीज दर आदेश | सुधारित अंदाज |
|---|---|---|---|
| | **खर्च** | | |
| १ | इंधन खर्च | १,२३५.४५ | १,१६२.४८ |
| २ | कार्यान्वियन आणि देखभाल खर्च | १५२.२२ | १५२.६१ |
| ३ | घसारा | २८.१६ | ३१.०३ |
| ४ | दीर्घकालीन कर्ज भांडवलावरील व्याज | २१.३२ | २०.२६ |
| ५ | खेळत्या भांडवलावरील व्याज | १३.०६ | २१.५९ |
| ६ | इतर खर्च | – | – |
| ७ | प्राप्तीकर | ४०.१८ | ५७.७१ |
| | | | |
| **क** | **एकूण खर्च (१+२+३+४+५+६+७)** | **१,४९०.३९** | **१,४४५.६९** |
| | | | |
| ८ | इक्विटीवरील परतावा | ९३.८१ | ९२.७१ |
| ९ | अधिक:उच्च पीएलएफसाठी प्रोत्साहन | – | – |
| १० | अधिक: इंधन खर्चात कार्यक्षमता प्राप्तीच्या २/३ | – | – |
| ११ | अधिक:कार्यान्वय आणि देखभाल खर्चात कार्यक्षमता प्राप्तीच्या २/३ | – | – |
| | | | |
| **ख** | **एकूण आरओई+ फायदा+ प्रोत्साहन (८+९+१०+११)** | **९३.८१** | **९२.७१** |
| | | | |
| | **महसूल** | | |
| १२ | विजेच्या विक्रीतून महसूल | १,५६६.९० | १,४८६.३१ |
| १३ | इतर उत्पन्न | १७.३० | १४.०७ |
| | | | |
| **ग** | **एकूण महसूल (१२+१३)** | **१,५८४.२०** | **१,५००.३९** |
| | | | |
| | **(महसुली तफावत/ (अतिरिक्त) ((क)+(ख))- (ग)** | **–** | **३८.०१** |

## ६. आर्थिक वर्ष १८–१९ आणि आर्थिक वर्ष १९–२० साठी एकत्रित महसूल आवश्यकता

या विभागामध्ये, बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०१५ मधील तरतुदींनुसार, आरइन्फ्रा–जी एआरआर चे सुधारित अंदाज तिसऱ्या नियंत्रण कालावधीच्या अर्थात आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० च्या उर्वरित तिसऱ्या व चौथ्या सहामाहीसाठी संभाव्य दर सादर करीत आहे.

आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२०साठी वार्षिक महसूल आवश्यकता मंजूर कराव्या अशी आरइन्फ्रा–जी माननीय आयोगाला विनंती करते.

### ६.१ संचालन कामगिरी

आरइन्फ्रा–जी ने एक्स–बस निर्मिती आणि इंधनाचा खर्च यांचा अंदाज बांधण्यासाठीची उपलब्धता आणि पीएलएफ वगळता आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०१५ मध्ये निर्दिष्ट केलेले संचालन निकष विचारात घेतले आहेत. १८ दिवसांचा (नियोजित – १५ दिवस, अनियोजित – ३ दिवस) प्रकप्लाचा अनुप्रयोग काळ विचारात घेऊन आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी प्रकल्पाची उपलब्धता विचारात घेतली आहे. अशाप्रकारे आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी ठरवलेली उपलब्धता अनुक्रमे ९५.०७% आणि ९५.०८% आहे. व्यवसायाची परिस्थिती नेहमीप्रमाणे राहील असे गृहीत धरून, आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी उपलब्धतेनुसार पीएलएफ विचारात घेतले आहे. त्याचप्रकारे, व्यवसायाच्या नेहमीच्या परिस्थितीनुसार, आर्थिक वर्ष २०१७–१८ च्या संभाव्य प्रत्यक्ष वापराऐवजी, एफजीडीचा वापर आर्थिक वर्ष २०१६–१७ च्या प्रत्यक्ष वापरानुसार विचारात घेतला आहे कारण आर्थिक वर्ष २०१७–१८ हे एक असामान्य वर्ष होते, ज्यामध्ये युनिट बंद पडल्यामुळे / कोळशाच्या कमतरतेमुळे तांत्रिकदृष्ट्या किमान वापर झाल्यामुळे एफजीडी वापर जास्त होता.

त्यानुसार, आरइन्फ्रा–जी आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी अनुक्रमे ४१६४ एमयू आणि ४१७६ एमयू ची एकूण निर्मिती करण्याचे प्रस्तावित करत आहे.

### ६.२ इंधनाचा खर्च

#### *६.२.१ इंधनाचे जीसीव्ही*

देशांतर्गत कोळशाच्या बाबतीत तो आर्थिक वर्ष १७–१८ साठी प्राप्त जीसीव्ही मानला गेला आहे अर्थात ३८७० किलोकॅलरी/किलो. आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी, ५० किलोकॅलरी/किलो साठ्याचे नुकसान गृहीत धरले आहे (जे आर्थिक वर्ष २०१६–१७ चे प्रत्यक्षात साठ्याचे नुकसान होते) आणि जाळलेला जीसीव्ही अंदाजे ३८२० किलोकॅलरी/किलो धरला आहे.

आयात कोळशाच्या बाबतीत, आरइन्फ्रा–जीने माननीय आयोगाच्या सूचनेनुसार आयात कोळसा खरेदी करण्यासाठी स्पर्धात्मक बोली लावलेली आहे. या कोळशाची जीसीव्ही आर्थिक वर्ष २०१७–१८ च्या पहिल्या सहामाहीतील प्रत्यक्ष जीसीव्ही इतकाच असणे अपेक्षित आहे, जो ४२३२ किलोकॅलरी/किलो आहे, त्यामुळे तो आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२०साठी प्राप्त जीसीव्ही मानला गेला आहे. आयात कोळशाचे आर्थिक वर्ष १६–१७ चे प्रत्यक्षात साठ्याचे नुकसान ११३ किलोकॅलरी/किलो झाले आहे. त्यानुसार आर्थिक वर्ष १८–१९ आणि आर्थिक वर्ष १९–२० चे साठ्याचे नुकसान १०० किलोकॅलरी/किलो मानले गेले आहे आणि अशा प्रकारे आयात कोळशाचा जाळलेला जीसीव्ही अंदाजे ४१३२ किलोकॅलरी/किलो धरला आहे.

### *६.२.२ इंधनाचा जमिनीवरील खर्च*

देशांतर्गत कोळशाबाबत, आरइन्फ्रा–जीने आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० या दोन्हींसाठी अलीकडील तीन महिन्यांचा सरासरी प्रत्यक्ष खर्च विचारात घेतला आहे अर्थात जुलै २०१७ ते सप्टेंबर २०१७. विचारात घेतलेला खर्च दर मेट्रीक टनाला सुमारे ४६२५ रुपये आहे.

आयात कोळशाच्या बाबतीत आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी विचारात घेतलेली किंमत ही आर्थिक वर्ष २०१७–१८ साठीची वार्षिक अंदाजे जमिनीवरील किंमत दर मेट्रीक टनाला सुमारे ५३३६ रुपये आहे (प्रवासातील नुकसानासह).

पुढे, आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी तात्पुरते समायोजन विभागात दिल्याप्रमाणे, सीमाशुल्काद्वारे मागणी केलेल्या खर्च वसुली शुल्कांचा विचार करता, आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी वार्षिक १ कोटी रुपये खर्चाचा अंदाज आहे आणि ही किंमत आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० च्या इंधन खर्चात समाविष्ट केली आहे.

अशाप्रकारे, आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी दावा केला जात असलेला एकूण इंधन खर्च अनुक्रमे १२५७.६४ कोटी रुपये आणि १२६१.२६ कोटी रुपये आहे.

### *६.३ कार्यान्वयन आणि देखभाल खर्च*

आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी तात्पुरते समायोजन विभागामध्ये चर्चा केल्यानुसार, आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी परवानगी असलेला मूलभूत कार्यान्वयन आणि देखभाल खर्च, माननीय आयोगाने बहुवर्षीय वीज दर नियमावलीमध्ये केलेल्या सुधारणांमध्ये प्रस्तावित सूत्रावर आधारित सुधारणा केलेला आहे. त्यानुसार, आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी मूलभूत कार्यान्वयन आणि देखभाल खर्चाचा अंदाज बांधण्यासाठी, या याचिकेनुसार, आर्थिक वर्ष २०१७–१८ साठीच्या मूलभूत कार्यान्वयन आणि देखभाल खर्चांना ४.२६% हा वृद्धी घटक लावला आहे (१% वृद्धी घटकाने गोळाबेरीज केलेला), यामधून पाण्याचे शुल्क आणि कॉर्पोरेट वाटप खर्च वगळला आहे ज्याचा भत्त्याव्यतिरिक्त स्वतंत्रपणे दावा केला जात आहे. आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी कार्यान्वयन आणि देखभाल खर्च अनुक्रमे १५९.१२ कोटी रुपये आणि १६५.९० कोटी रुपये होण्याचा अंदाज आहे.

### ६.४ भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

आरइन्फ्रा–जी नमूद करते की चालू असलेल्या योजनांची वर्तमान स्थिती आणि केवळ तातडीच्या योजनांची अंमलबजावणी यावर आधारित आरएलए अभ्यासाच्या निष्पत्तीनुसार आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठीच्या भांडवली खर्च योजनेवर पुनर्विचार केला गेला आहे. आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी अनुक्रमे ३६ कोटी रुपये आणि ७८ कोटी रुपयांच्या भांडवलीकरणाचा आरइन्फ्रा–जीचा अंदाज आहे.

### ६.५ कर्ज–इक्विटी प्रमाण

म.वि.नी.आ बहुवर्षीय वीज दर नियमावली २०१५ मधील नियम क्रमांक २६ मधून ७०:३० च्या कर्ज इक्विटी प्रमाणानुसार भांडवली आणि देखभाल योजनांच्या निधीपुरवठ्यांना विनिर्दिष्ट करण्यात आले असून त्यालाच आरइन्फ्रा–जीकडून आ.व. २०१८–१९ आणि आ.व. २०१९–२० साठी इक्विटीवरील परताव्याच्या आणि कर्जावरील व्याजाच्या मोजमापासाठी निकषात्मक निधी म्हणून मानले गेले आहे.

### ६.६ घसारा

घसाऱ्या बाबत (नियम क्रमांक २७) बहुवर्षीय वीज दर नियमावली २०१५ मधील तरतुदीनुसार घसारा मोजला गेला आहे.

आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० मध्ये समाविष्ट करण्यात येणाऱ्या मालमत्तांच्या अंदाजासाठी, मध्यावधीची बेरीज विचारात घेऊन आणि अर्ध्या कालावधीचा घसारा मोजला गेला आहे.

### ६.७ खेळत्या भांडवलावरील व्याज

आरइन्फ्रा–जीने म.वि.नी.आ बहुवर्षीय वीज दर नियमावली २०१५ च्या नियम ३१ नुसार खेळती भांडवली आवश्यकता मोजली आहे.

आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठीचा व्याज दर, बहुवर्षीय वीज दर (पहिली सुधारणा) नियमावली, २०१७ नुसार विचारात घेतला आहे, अर्थात एक वर्षाचा एमसीएलआर अधिक १५० बेसिक पॉईंट्स. एसबीआयने घोषित केलेला एक वर्षाचा एमसीएलआर ०१–०६–२०१८ पासून ८.२५% आहे आणि त्यानुसारच तो विचारात घेतला आहे.

### ६.८ कर्ज भांडवलावरील व्याज

आरइन्फ्रा–जी सादर करते की प्रस्तावित भांडवलीकरणासाठी वित्तपुरवठा करण्याकरिता बाहेरून कर्ज घेतलेले नसल्यामुळे, त्यासाठी अंतर्गत उपार्जनातून निधी देण्याचे प्रस्तावित आहे.

बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०१५ अनुसार, हे वापरलेले भांडवल प्रमाणक कर्ज धरले जाते ज्याचा प्रमाणक व्याज दर १०.३२% आणि १०.५०% आहे, जो बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०१५ च्या नियम २९ नुसार आरइन्फ्रा–टी आणि आरइन्फ्रा–डी च्या अन्य नियंत्रित व्यवसायांच्या कर्जांना लागू होणाऱ्या व्याज दराचा सरासरी दर असून तो अनुक्रमे आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० मधील कर्जावरील व्याज मोजण्यासाठी विचारात घेतला आहे.

### ६.९ इक्विटीवरील परतावा

म.वि.नी.आ बहुवर्षीय वीज दर नियमावली २०१५ च्या नियम २८.३ मध्ये विशिष्ट वर्षाच्या आरंभीच्या इक्विटी पायावर १५.५% दराने आणि त्या वर्षामध्ये वाढलेल्या ५०% इक्विटीवर परताव्याची तरतूद विनिर्दिष्ट करण्यात आली आहे. त्यानुसार, आरइन्फ्रा–जीने आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी परवानगीयोग्य आरओई मोजला आहे.

### ६.१० प्राप्तीकर

आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी, आरइन्फ्रा–जीसाठीचा प्राप्तीकर आर्थिक वर्ष २०१६–१७ इतकाच असेल असे तात्पुरत्या स्वरूपात अंदाजित केले आहे.

### ६.११ वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न

आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्नाचा पुन्हा अंदाज बांधण्यासाठी, आरइन्फ्रा–जीने आर्थिक वर्ष १७–१८साठीच्या तात्पुरत्या समायोजनासाठी या याचिकेमध्ये जी पातळी विचारात घेतली आहे ती, वजा राखेच्या विक्रीतून येणारे ५.१८ कोटी रुपयांचे उत्पन्न असा अंदाज बांधला आहे.

## ६.१२ आ.व. १५–१६ आणि आ.व. १६–१७ च्या महसूल तफावत/अधिशेष वरच्या वहन खर्चासहित आ.व. १७–१८ पर्यंतची एकत्रित महसुली तफावत

बहुवर्षीय वीज दर नियमावली, २०११ नुसार अर्थात एसबीआय पीएलआरनुसार आर्थिक वर्ष २०१५–१६ महसुली तफावतींवरील वहन खर्च/(अतिरिक्त) मोजला आहे. आर्थिक वर्ष २०१५–१६ साठीचे एसबीआय पीएलआर १४.७५% आहे, ज्याचा माननीय आयोगाने बहुवर्षीय वीज दराच्या आदेशातही विचार केला होता.

आधी दिलेल्या तर्कानुसार, आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी वहन खर्च एसबीआयचा बेस रेट अधिक १५० बेसिक पॉईंट्स असा मोजला आहे, जो १०.७९% येतो.

त्यानुसार, आरइन्फ्रा–जीने खालील तक्त्यात दिल्यानुसार आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी वहन खर्च आणि एकत्रित महसुली तफावत / अतिरिक्त मोजले आहे.

**तक्ता ४: वहन खर्च आणि एकत्रित महसुली तफावत गणन**

| तपशील / कोटी रुपये | कोटी रुपये |
|---|---|
| आर्थिक वर्ष २०१५–१६ साठी वाढीव महसुली तफावत | ७०.८४ |
| आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी महसुली तफावत | (४१.१३) |
| आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी तात्पुरती महसुली तफावत | ३८.०१ |
| आर्थिक वर्ष २०१५–१६ साठी वहन खर्च | १३.८९ |
| आर्थिक वर्ष २०१६–१७ साठी सुधारित वहन खर्च | (४.१९) |
| **वहन खर्चासह एकूण महसुली तफावत** | **७७.४४** |

उपरोक्त महसुली तफावत एकाच आर्थिक वर्ष २०१८–१९ मध्ये भरून काढण्याचा आणि आर्थिक वर्ष १९–२० पर्यंत जाऊ न देण्याचा आरइन्फ्रा–जीचा प्रस्ताव आहे, ज्यामुळे अधिक वहन खर्च टाळता येईल. उपरोक्त महसुली तफावतीवर, आरइन्फ्रा–जीने अर्ध्या वर्षासाठीचा वहन खर्च मोजला आहे कारण आर्थिक वर्ष २०१८–१९ मधील वसूली संपूर्ण वर्षभर होत राहील. ही पुढील वहन खर्च रक्कम ३.७८ कोटी रुपये आहे.

## ६.१३ आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी वार्षिक महसूल आवश्यकता

वर चर्चा केलेल्या खर्चाच्या घटकांवर आधारित, आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठीची सुधारित वार्षिक महसूल आवश्यकता खालील तक्त्यामध्ये दिली जात आहे:

**तक्ता ५: आर्थिक वर्ष २०१८–१९ आणि आर्थिक वर्ष २०१९–२० साठी वार्षिक महसूल आवश्यकता**

| तपशील | आर्थिक वर्ष २०१८–१९ | | आर्थिक वर्ष २०१९–२० | |
|---|---|---|---|---|
| | मंजूर | सुधारित अंदाज | मंजूर | सुधारित अंदाज |
| इंधन खर्च | ११८६.१० | १२५७.६४ | ११८९.६३ | १२६१.२६ |
| कार्यान्वयन आणि देखभाल खर्च | १५६.७४ | १५९.१२ | १६१.४० | १६५.९० |
| घसारा | ३०.१५ | ३३.८५ | ३२.१४ | ३६.८० |
| दीर्घकालीन कर्ज भांडवलावरील व्याज | २७.८८ | १९.२४ | ३४.६९ | २०.०६ |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | १३.१५ | २१.३१ | १३.४६ | २१.४४ |

| तपशील | आर्थिक वर्ष २०१८-१९ | | आर्थिक वर्ष २०१९-२० | |
|---|---|---|---|---|
| | मंजूर | सुधारित अंदाज | मंजूर | सुधारित अंदाज |
| इतर खर्च | - | - | - | - |
| प्राप्तीकर | ४०.१८ | ५७.७१ | ४०.१८ | ५७.७१ |
| **एकूण खर्च** | **१४५४.२०** | **१५४८.८७** | **१४७१.५०** | **१५६३.१८** |
| अधिक : इक्विटीवरील परतावा | ९९.९३ | ९५.१८ | १०६.०१ | ९७.८३ |
| वजा: इतर उत्पन्न | -१७.३० | -८.८९ | -१७.३० | -८.८९ |
| आर्थिक वर्ष १७-१८ पर्यंत एकत्रित महसुली तफावत/(अतिरिक्त) | | ७७.४४ | | |
| एकत्रित महसुली तफावतीवरील अर्ध वार्षिक वहन खर्च* | | ३.७८ | | |
| **वार्षिक महसूल आवश्यकता** | **१५३६.८३** | **१७१६.३७** | **१५६०.२१** | **१६५२.११** |

*मोजलेल्या एकत्रित महसुली तफावतीमुळे आर्थिक वर्ष १८-१९ मध्ये वहन खर्च वाढेल, कारण तो संपूर्ण वर्षात एकसारखा वसूल केला जाईल असे गृहीत धरले जाईल. त्यानुसार, ९.७५% दराने वहन खर्च मिळवला गेला आहे (प्रचलित एसबीआय एमसीएलआर + १५० बेसिक पॉईंट्स).

हे स्पष्ट केले गेले आहे की, दरपत्रकातून वसुली करण्यासाठी, आर्थिक वर्ष १८-१९ (सहामाही) करिता संबंधित वहन खर्चासह एकत्रित महसूल आर्थिक वर्ष १८-१९ साठी क्षमता (स्थिर) शुल्कामध्ये समाविष्ट केला आहे.

आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठीचा सुधारित स्थिर खर्च आणि उर्जा शुल्क खालील तक्त्यामध्ये दिले जात आहे:

**तक्ता ६: आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी क्षमता (स्थिर) शुल्क आणि उर्जा शुल्क दर**

| तपशील | युओएम | आर्थिक वर्ष २०१८-१९ | | आर्थिक वर्ष २०१९-२० | |
|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | सुधारित अंदाज | मंजूर | सुधारित अंदाज |
| क्षमता (स्थिर) शुल्क | कोटी रुपये | ३५०.७४ | ४५८.७३ | ३७०.५८ | ३९०.८५ |
| उर्जा शुल्क दर एक्स-बस | रुपये/किलोवॅट | ३.२५२ | ३.३४१ | ३.२५२ | ३.३४१ |

आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० साठी वर प्रस्तावित सुधारित एआरआर आणि स्थिर व उर्जा शुल्कास मंजूरी देण्याची आरइन्फ्रा-जी माननीय आयोगाला विनंती करते.